**<u>पुढील उलटपास प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे वकील श्री. बी. एन. प्रभु यांचे मार्फत</u>**

२३. निशाण २१६ व २१७ वरील खंडाची पावती स्विकारताना मी त्या पावतीवरील कुळाची किंवा त्याच्या एजंटाची सही किंवा अंगठयाचा ठसा असे सदर माझे निदर्शनास आले होते.

प्रश्न— या सदर सदरामध्ये पावती देणा—या व्यक्तीने तुम्हाला सहया करायला सांगितले होते का?

उत्तर— पावती देणा—या व्यक्तीने स्थळप्रतीवर आमच्या सहया घेतल्या.

माझे म्हणण्याप्रमाणे ज्यावेळेस सहया करण्यात आल्या त्यावेळेस स्थळप्रती देवस्थानच्या ताब्यात होत्या.

२४. २००४—२००५ या शेती वर्षामध्ये खंड म्हणुन मी देवस्थानाला १० कुडव तांदुळ पिकाचा हिस्सा व नक्त खंड रुपये ३१/— दिले. तत्पुवी खंड म्हणून माझे पुर्वाधिकारी पिकाचा हिस्सा म्हणुन १० कुडव तांदुळ आणि नक्त खंडाची आकारणी कृषक दिनापासून करण्यात आलेली असल्यामुळे तेव्हापासून देवस्थान सदर रक्कम वसुल करत होती. सुरवातीला ती रक्कम १९५६—१९५७च्या कालावधीत सातबारावर नमूद केल्याप्रमाणे २/— रुपये अशी नमूद आहे. सद्या ३१/— रुपये खंडाची रक्कम आहे.

२५. सन १९८५, सन १९९२, सन १९९३ साली आमचे कुटुंबाकडून ३१/— रुपये नक्त खंड व १० कुडव तांदुळ देवस्थानाला दिल्याचे मला ठाऊक आहे. सन १९८५, १९९२, १९९३, २००४ व २००५ साली देवस्थानाला पिकाच्या हिश्श्याच्या स्वरुपात दिलेल्या खंडाची पावती मी अगर माझे पुर्वाधिकारी यांनी मागितलेली नाही.

प्रश्न— तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही अगर तुमच्या पुर्वाधिका—यांनी पिकाच्या हिश्श्याच्या स्वरुपात देवस्थानास जो खंड दिला त्या खंडाच्या पावत्या आजमितीपर्यंत कधीही देवस्थानने तुम्हास दिल्या होत्या का?

उत्तर— देवस्थान सुरुवाती कृषक दिनाच्या पुर्वीपर्यंत पिकाचा हिस्सा स्विकारुन तशा पावत्या देत होते. कृषक दिनानंतर नक्त खंडाची आकारणी केलेली होती व तशा पावत्या दिल्या गेल्या.

प्रश्न—तुमच्या म्हणण्याप्रमाणे सन १९८५, १९९२, १९९३, २००४ व २००५ साली देवस्थानाला पिकाच्या हिश्श्याच्या स्वरुपात दिलेल्या खंडाची पावती देवस्थानने

तुम्हाला दिली होती का?

उत्तर— नक्त खंडाच्या पावत्या दिल्या होत्या. पिकाच्या हिश्श्याचा जो खंड दिला जायचा त्याच्या पावत्या दिल्या जात नव्हत्या.

२६. प्रश्न— तुमच्या म्हणण्या प्रमाणेच्या निशाण २१४ ते २१७ कडील खंड पावत्यांमध्ये नमूद करण्यात आलेला नक्त खंड किती होता हे तुम्हाला सांगता येईल का?

उत्तर— देवस्थानच्या आमच्याकडे असणा—या एकुण ४ मिळकतीचा आम्ही एकत्रितपणे ३१/— रुपये नक्त खंड अदा केला.

(प्रतिवादीच्या वकिलांनी येथे असे नमुद केले की 'साक्षीदार याने त्याच्या प्रश्नाचे नेमके उत्तर देणे आवश्यक आहे. साक्षीदाराने नेमके उत्तर देणे जाणीवपूर्वक टाळले. साक्षीदार अशाच प्रकारची उत्तरे देतो.' **अशा परिस्थितीमध्ये साक्षीदार काय उत्तर देतो याचा अर्थ न्यायनिर्णयाच्या वेळेस विचारात घेतला जाईल**.)

२७. (<u>साक्षीदाराला निशाण २१४, २१५ व २१६ वरील पावती दाखविण्यात आली</u>.) सदर पावत्यांवरील नक्त खंडाची तीन वेगवेगळया रकमांमधील आकारणी कशी करण्यात आली याबाबत मला सांगता येणार नाही. आमच्यात व देवस्थानामध्ये नक्त खंडाची रक्कम किती ठरली होती हे दर्शविण्यासाठी याकामी दाखल केलेल्या पावती व्यतिरिक्त असणारा कागदोपत्री पुरावा देवस्थानाच्या दप्तरी आहे. त्या पुराव्यामध्ये खतावणी व देवस्थानाने नक्त खंडासदंर्भात केलेल्या याद्या समाविष्ट आहेत.

प्रश्न— तुमच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीबांबत देवस्थानाला पिकाच्या हिश्श्याचा स्वरुपात किती खंड देण्यात आला?

उत्तर— आम्ही देवस्थानाला कुळपणास असलेल्या मिळतीचा एकत्रीतपणे खंड देत होतो, त्यामुळे नेमके सांगता येणार नाही.

प्रश्न— सन २००५ सालापासून आजपर्यंत तुम्ही दावा जमिनीबाबतचा खंड देवस्थानाला दिला आहे का?

उत्तर— प्रचलित पध्दतीनुसार आजपर्यंत आम्ही संयुक्तपणे खंड देत आलेलो आहे.

२८. त्याबाबतच्या पावत्या देवस्थानाने आम्हाला दिलेल्या होत्या. त्या पावत्या मी हजर करु शकतो. सदर पावत्या आजमितीपर्यंत हजर करण्यास मला काही अडचण नव्हती. सदर पावत्या गरज असल्यास मी हजर करेन. (**प्रतिवादीच्या वकिलांनी असा प्रश्न विचारला की सन २००५ नंतरच्या पावत्या वादी यांनी हजर करणे त्यांना आवश्यक वाटते किंवा कसे? या प्रश्नास वादीच्या वकिलांनी हरकत घेतलेली आहे की असा प्रश्न साक्षीदारास विचारता**

**येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये वादी याला दाव्यासदंर्भात काय कागद हजर करायचे आहेत तो त्याचा वैयक्तीक प्रश्न आहे. साक्ष देत असताना तशी कागदपत्रे तो हजर करेल किंवा कसे असे त्याला विचारणे उचित नाही. कागदपत्र हजर करणे हा विषय एखादा पक्षकार विचारविनीमय करुन किंवा आपल्या वकिलांशी विचारुन त्याचा निर्णय घेवू शकतो. आतापर्यंत सादर केलेल्या कागदपत्रा व्यतिरिकत वादी जर एखादा कागद हजर करणार असेल तर त्यावेळेसच्या परिस्थितीनुसार त्याबाबतचा निर्णय घेता येणारा आहे. अर्थात, कागदपत्र शाबीत करण्याची जबाबदारी ज्या–त्या पक्षकाराची आहे. त्यास अनुसरुन विरुध्द पक्षकारांस नैसर्गिक न्यायतत्वानुसार उलटतपास घेण्याची संधी देता येईल. सबब, तसा प्रश्न या क्षणी विचारात घेतला जावु शकत नाही.**)

२९. दावा जमिनीचा दस्त देवस्थान भरते. सदर पध्दत पुर्वीपासून आहे. (साक्षीदाराला निशाण २१५ व २१६ वरील खंडाच्या पावत्या दाखविण्यात आल्या.) तुमच्या म्हणण्याप्रमाणे देवस्थान जर दस्त भरत असेल तर सदर पावत्यांवर तुम्ही दस्त भरला असा उल्लेख का नमूद आहे. आम्ही देवस्थानाला एकुण नक्त खंड ३१/–रुपये अदा करतो, त्यातून देवस्थान काय विभागवारी करते याची मला माहिती नाही.

३०. प्रश्न– तुम्ही सांगितल्याप्रमाणे नक्त खंड म्हणुन ३१/– रुपये तुम्ही देवस्थानाला दिले असा उल्लेख कोणत्याही खंड पावतीत नाही?

उत्तर– देवस्थानाच्या चारही पावत्यांवर खंड म्हणुन ३१ रुपये ४५ पैसे इतका खंड दिल्याचा उल्लेख आहे.

मी सादर केलेल्या निशाण २१७ वरील खंड पावत्यामध्ये असलेल्या क्षेत्राचा उल्लेख गुंठयामध्ये नमूद केलेला आहे. मी सादर केलेल्या निशाण २१४, २१५ व २१६ वर क्षेत्रफळाचा उल्लेख संक्षिप्त स्वरुपात केलेला आहे. मला जमिन मोजणीचे परिमाण व संक्षिप्त या दोन शब्दप्रयोगांमधील फरक पुर्णपणे कळत नाही. निशाण २१४ ते २१६ वरील पावतीमध्ये नमूद असलेल्या जागेच्या क्षेत्राचे परिमाण मला सांगता येणार नाही.

३१. हे म्हणणे खरे नाही की मी सादर केलेल्या पावत्या खोटया व बोगस आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी देवस्थानाकडे लिपीक म्हणून काम करत असताना देवस्थानाच्या पदाधिका–यांशी संगनमत करुन खोटया खंड पावत्या तयार केल्या. हे म्हणणे खरे नाही की सदर पावत्या बनावट व खोडसाळ असल्यामुळे त्याच्या सत्यप्रती देवस्थानाच्या ताब्यात नाहीत. हे म्हणणे खरे नाही की २००५ सालानंतर मी खोटया पावत्या तयार करु शकलो नसल्यामुळे माझेकडे या कालावधीतील पावत्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की २००५

नंतर देखील देवस्थानातील पदाधिका—यांशी माझे संगनमत होते. हे म्हणणे खरे नाही की देवस्थानाचे भुतपुर्व पदाधिकारी शरद कांबळी आणि गणेश रघुनाथ रेघे यांचेशी संगनमत करुन मी खंडाच्या पावत्या तयार केल्या. हे म्हणणे खरे नाही की मी देवस्थानामध्ये लिपीक म्हणून काम करत असल्यामुळे शदर कांबळी आणि गणेश रेघे यांनी मला खंडाच्या पावत्यावर सहया करुन दिल्या. हे म्हणणे खरे नाही की माझे वडिलांचा मृत्यू १९७८ साली झालेला असून देखील तद्नंतर १९८५, १९९२ व १९९३ साली माझे वडिलांनी खंड आणून भरला अशा नोंदीच्या बनावट पावत्या याकामी मी सादर केल्या.

प्रश्न— गोविंद बाळकृष्ण येसजी यांच्याकडून खंड पावला हा उल्लेख तुम्हाला मान्य आहे का?

उत्तर— गोविंद बाळकृष्ण येसजी असे माझे वडिलांचे नावे खंड आमच्या हस्ते अदा केलेला आहे.

३२. प्रश्न— खंडाच्या पावतीवरती माझे वडिलांची मृत्युपश्चात वडिलांच्या नावे वारसांनी खंड भरला अशी नोंद खंडाच्या पावतीवर व्हावी अशी मागणी तुम्ही देवस्थानाच्या पदाधिका—यांकडे केली होती का?

उत्तर— मी चौकशी केली होती. त्यांनी मला वडिलांचे मृत्युप्रमाणपत्र आणि सातबरा सदरी आमचे वारस म्हणुन नोंद झाल्याचे दाखले देण्यास सांगितले. त्याप्रमाणे कार्यवाहीची पुर्तता करुन १९९७—१९९८ साली वडिलांचे नाव निर्लेखीत करुन माझे नाव देवस्थानाच्या खतावणीमध्ये नोंदविण्यात आले.

३३. वारस तपासाची माहिती देवस्थानाला मी १९९७—१९९८ साली दिली. माझे म्हणण्याप्रमाणे तोपर्यंत देवस्थानाला त्याबाबतची माहिती होती. मात्र आमच्याकडून त्याबाबतची पुर्तता झाली नाही.

**मध्यांतराची वेळ झालेने पुढील उलटतपास दुपारचे सत्रापर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक :— १४/११/२०१८. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

**<u>पुढील उलटपास दुपारचे सत्रानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे वकील श्री. बी. एन. प्रभु यांचे मार्फत</u>**

३४. हे म्हणणे खरे आहे की मधुसुदन मेस्त्री हे २००० सालापासून आजपर्यंत

आडेली गावाचे पोलीस पाटील आहेत. मी मार्टिना येरमु मोन्टेरो यांना ओळखत नाही. मी सुलभा प्रभाकर पणशीकर याना ओळखतो. २००५ सालात सुलभा पणशीकर या आरवली गावच्या ग्रमपंचायत सदस्य होत्या असे माझे ऐकिवात आहे. पी आगेन्ल पावलु फर्नांडीस यांना मी ओळखत नाही. महेंद्र रामचंद्र सावंत यांना मी ओळखतो. ते मयत आहेत. मला याची माहिती नाही की ते ग्रामपंचयतीचे सदस्य होते किंवा कसे. मी सुनिल विठ्ठल दळवी यांना ओळखतो. मला याची माहिती नाही की ते २००५ साली आरवली गावचे ग्रामपंचायतीचे सदस्य होते किंवा कसे. दावा जमिनीच्या पुर्व दिशेला कोणती जमिन आहे याची तपशिलवार माहिती मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा जमिनीला लागुन दक्षिण दिशेला रमेश बाबु राणे यांची सर्व्हे नं. १३ हिस्सा नं. २० सोन्सुरे गांव ही जमिन आहे. माझे म्हणण्याप्रमाणे ती जमिन दावा जमिनीच्या पुर्व दिशेला आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीला लागून पूर्व दिशेला शंकर लाडु राणे यांची सर्व्हे नं. १८ हिस्सा नं. १ सोन्सुरे ही जमिन आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की पुर्व दिशेला ती लागून नाही मात्र पुर्व दिशेला आहे. दावा जमिनीला लागून पूर्वेला सर्व्हे नं. १६ हिस्सा नं. २ व ३ या जमिनी असून, त्यानंतर शंकर राणे यांची जमिन आहे.

३५. वसंत राघोबा मडवळ उर्फ मराठे यांना मी ओळखतो. ते आज हयात नाहीत. हे म्हणणे खरे नाही की त्यांची जमिन दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुला लागुन आहे. माझे म्हणण्याप्रमाणे सदर जमिन दक्षिण दिशेस लागून नाही. दावा जमिन व वसंत यांच्या जमिनीच्या दरम्यान अंदाजे दिडशे मीटर इतके अंतर आहे. त्या दरम्यान नाला देखील आहे. सुमित रमाकांत उर्फ रमेश आरोलकर उर्फ मडवळ या लगत कब्जेदार म्हणुन मला माहिती आहेत. मात्र त्यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यांची जमिन दावा मिळकतीच्या पश्चिमेस लागून आहे. बाळकृष्ण सदाशिव राणे यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की बाळकृष्ण राणे यांची जमिन दावा मिळकतीच्या पूर्वेस आहे. मात्र ती जमिन दावा मिळकतीला लागून नाही.

३६. प्रतिवादीच्या वकिलांनी असा प्रश्न विचारला की वादी यांनी दुसरे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी जो अर्ज दिला त्यामध्ये पहिले दिलेले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र पुराव्यातून वगळावे अशी मागणी करण्यात आलेली नाही, तसेच तशी मागणी करण्यासाठी काही अडचण होती का, याला वादीच्या वकिलांनी हरकत घेतलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी यांनी निशाण १८७ येथे दुसरे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी अर्ज केलेला आहे. तो या खटल्याचा भाग आहे. तो अर्ज कशासाठी करण्यात आला होता व त्यावरती

काय आदेश करण्यात आला ही गोष्ट खटल्याच्या रेकॉर्डला आहे. सबब त्यावेळेस वादी यांनी तशी विनंती केली होती का व तसे न केल्यास त्याचा काय परिणाम होतो हा केवळ कायदेशीर मुद्दा असल्यामुळे त्यास अनुसरुन प्रतिवादींना प्रश्न विचारता येणार नाही. तरी देखील, **सदर अर्ज व त्यावरील आदेश हा प्रतिवादी यांच्या प्रश्नाचे स्वरुप पाहता 'क' फाईलमध्ये ठेवण्यात यावे.**

३७. (साक्षीदाराला निशाण १७७ च्या फेरीस्तासोबत हजर करण्यात आलेल्या अ.क्र. १ व २ येथे असलेल्या ठरावाची प्रती दाखविण्यात आल्या.) सदर कागद मला मान्य आहेत. (**सदर कागदांना निशाण २३४ व २३५ देण्यात आले.**) (निशाण १८१ च्या फेरीस्तावरील आदेशाप्रमाणे अ.क्र. २ येथे असणा—या कागदांमधील ठराव क्र. ३ याला पुराव्यात दाखल करुन घेण्यात आलेले आहे. **सबब त्या ठरावाला निशाण क्र. २३६ देण्यात आले.**)

३८. हे म्हणणे खरे नाही की दावा जमिन ही प्रतिवादी क्र. १ ते ३ याचे आजोबा गोविंद भिसाजी मडवळ यांनी आरवली देवस्थानाकडून प्रथमतः कुळपणास स्विकारली. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर त्यांनी दावा जमिनीमध्ये अंगमेहनतीने नारळ, आंबा, काजु, कोकम, सुरंगीची झाडे आणि इमारती उपयोगाची अन्य जंगली झाडांची उपर्जना केली. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीचा उत्पन्न तेच घेत होते आणि दावा मिळकती संदर्भात खंड म्हणुन रक्कम रुपये २ /— देवस्थानाला देत होते. हे म्हणणे खरे नाही की त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा म्हणजे प्रतिवादी क्र. १ ते ३ चे वडिल आत्माराम गोविंद मडवळ यांचेकडे दावा मिळकतीचा कुळपणा पुढे चालत आला. हे म्हणणे खरे नाही की त्यांनी देखील दावा मिळकतीमध्ये विविध उत्पन्नाची झाडे लावली, दावा मिळतीतून उत्पन्न घेतले व दावा मिळकतीचा खंड म्हणुन रक्कम रुपये ५/— देवस्थानाला त्यांच्या मृत्युपर्यंत दिली. मला याची माहिती नाही की आत्माराम मडवळ हे १९८७ सालात मयत झाले किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की १९८७ सालापासून प्रतिवादी क्र. १ ते ३ चे कुटुंब यांची कुळहक्काची कब्जावहिवाट दावा मिळकतीमध्ये चालु आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवर्षी खंड म्हणुन रक्कम रुपये १०/— देवून प्रतिवादी कुटुंब दावा जमिनी कुळ म्हणुन उपभोगतात. हे म्हणणे खरे नाही की १९२६ सालापासून प्रतिवादी १ ते ३ यांचे पुर्वाधिकारी व आता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे कुटुंब दावा जमिन कुळ म्हणुन उपभोगत आहेत. हे म्हणणे खरे आहे की आरवली गावची प्रतिष्ठीत मंडळी श्रीदेव वेतोबा देवस्थान आरवलीच्या न्यासावर पदाधिकारी म्हणुन असतात. हे म्हणणे खरे नाही की देवस्थानाच्या न्यासाचा विश्वस्थांवर विश्वास असल्यामुळे प्रतिवादी १ ते ३ यांनी त्यांचेकडे खंडाच्या पावतीची मागणी केली नाही आणि

त्यामुळे देवस्थानाने त्यांना दावा मिळकतीबाबत खंडाच्या पावत्या दिल्या नाहीत.

३९. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी याचे पुर्वाधिकारी गोविंद भिसाजी मडवळ यांनी बांधकाम केलेली विहीर आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या विहीरीचा पाण्याचा वापर प्रतिवादी हे दावा मिळकतीतील बागायतीची मशागत करण्यासाठी वापरात आले आहेत. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकत ही माझे पुर्वाधिकारी व त्याचे नंतर माझे कुटुंबियाच्या कब्जा वहिवाटीत असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा जमिनीमध्ये आमची उठवणीची व कब्जा वहिवाटीची झाडे आहेत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळतीचे मी उत्पन्न घेतो व दावा मिळकतीचा खंड देवस्थानास देतो असे मी खोटे सांगत आहे. माझा आजोबांचा व्यवसाय शेती होती. माझे वडिल शासकीय नोकर होते व शेती देखील करत होते. माझे वडिल ग्रामसेवक होते. हे म्हणणे खरे नाही की माझे पुर्वाधिकारी यांनी महसुल अधिका—यांशी हातमिळवणी करुन दावा जमिनीच्या अधिकार अभिलेखात त्यांची नावे कुळ सदरी नोंदवून घेतली. हे म्हणणे खरे नाही की सदर नोंदीचा गैरफायदा घेवून देवस्थानाचे २००५ सालातील अध्यक्ष प्रसन्ना महाबळेश्वर प्रभु आणि सचिन गणेश रघुनाथ तथा रवी रेघे यांचेशी संगनमत करुन मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुत दावा सदर प्रसन्ना प्रभु व गणेश रेघे यांनी देवस्थानाच्या निधीतून प्रायोजित केला. हे म्हणणे खरे नाही की प्रभु व रेघे यांचे सुयुक्त विद्यमाने दावा मिळकत बळकविण्यासाठी मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीकडे माझा अगर माझे पुर्वाधिकारी यांची कधीही कब्जावहिवाट व कसवट नव्हती व आजही नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा जमिनीकडे माझा अगर माझे कुटुंबाचा कोणताही हक्कसंबंध नव्हता व नाही. माझा भाऊ अविवाहीत आहे. हे म्हणणे खरे नाही की केवळ महसुल दप्तरी असणा—या नोंदीवर आधारीत राहून मी जमिन बळकवावी म्हणुन प्रतिवादी यांचे विरुध्द खोटा दावा दाखल करुन या दाव्याचे कामी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की देवस्थानाचे पदाधिकारी बदलल्यावर ते दाव्याचे कामी खरी साक्ष देतील म्हणुन मी देवस्थानाला या दाव्यातून प्रतिवादी सदराखाली वगळले. माझा भाऊ आजरोजी उपलध नाही. तो घरामध्ये नाही. तो हरवल्याबाबतची फिर्याद मी शिरोडा पोलीस ठाणे येथे दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे परिवाला अगर माझे जवळच्या व्यक्तींना, नातेवाईकांना, मित्रमंडळीना माझा भाऊ कोठे असल्याबाबत काही माहिति नाही. माझा भाऊ ऑक्टोंबर २०१४ पासून परागंदा आहे. हे म्हणणे खरे नाही की तशी बाब मी न्यायालयापासून हेतुपुरस्सर रित्या लपविली आहे.

४०. निशाण २०८ च्या फेरीस्तासोबत अ.क्र. २ येथे सादर करण्यात आलेल्या

कुलअखत्यारपत्राची मुळप्रत माझेकडे आहे. मुळप्रत दाखल करायला मला काही अडचण नव्हती. सदर निशाण २०८ च्या फेरीस्तासोबत सादर करण्यात आलेल्या कुलअखत्यारपत्रामध्ये एकसारखी दोन पाने पेजींग मिस्टेकमुळे असु शकतात. मी सादर केलेले अखत्यारपत्र मला मान्य आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे व खोडसाळ अखत्यारपत्र दाखल केले. माझे भावाला दारुचे व्यसन होते हे मला माहिती आहे. माझा भाऊ न्यायप्रिय आणि सत्यप्रिय व्यक्ती होता. हे म्हणणे खरे नाही की मी भावाकडून दबाव टाकून कैफियत दिली. हे म्हणणे खरे नाही की माझा भाऊ प्रतिवादीच्या हिताविरुध्द साक्ष देईल म्हणुन मी त्याच्याकडून बोगस कुलअखत्यारपत्र तयार करुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील देवस्थानाच्या मालकी व्यतिरिक्त जो काही मजकुर आहे तो खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/—

दिनांक :— १४/११/२०१८.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.